पुढारी



सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विशेषांकाचे प्रकाशन कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपस्थित मान्यवर.

# मातृभूमी, मातृभाषा, सदाचार, संस्कृतीला विसरू नका

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे आवाहन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

आधुनिकीकरणाकडे वाटचाल करीत असताना मातृभाषा, सदाचार आणि संस्कृतीला विसरू नका. जगाकडून आपण शिकण्यापेक्षा आपण जगाला काय देऊ शकतो याचा विचार करा. नवीन शैक्षणिक धोरणानुसार मातृभाषेतून शिक्षण देण्याचा आग्रह धरायला हवा. प्रादेशिक भाषेतून मुलांना शिक्षण दिल्यास अभ्यासक्रमातील मूल्ये व तत्त्वे उत्तम पद्धतीने समजतात, असे मत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी व्यक्त केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात कोश्यारी बोलत होते. या वेळी महापौर मुरलीधर मोहोळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंझारराव आदी उपस्थित होते. या वेळी सेंट्रल सॉफीस्टीकेटेड ॲनॅलॅटीकल इन्स्ट्रुमेंटेशन फॅसिलिटी; तसेच प्रिन्सिपल व्हर्च्युअल केबीनचे डिजिटल स्वरूपात अनावरण व सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विशेषांकाचे प्रकाशन कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले.

कोश्यारी म्हणाले, देशात नवे शैक्षणिक धोरण आले आहे. त्यामध्ये मुलांचे शिक्षण हे मराठी, तेलगू, तमिळ, बांगला अशा प्रादेशिक भाषांमधून देण्याची तरतूद केली आहे. केंद्र सरकारमधील मंत्री व राज्यमंत्री यांच्यासोबतच अनेक मोठ्या व्यक्तिंना संपूर्ण इंग्रजी येत नाही. मात्र, आजही ते यशस्वी आहेत. त्यामुळे इंग्रजीचे शिक्षण आवश्यक त्या गोष्टींसाठी घ्यायला हवे; मात्र शिक्षणासाठी मातृभाषेचा आग्रह धरायला हवा, असेही त्यांनी सांगितले.

जगात विविध क्षेत्रांत नावीन्यपूर्ण संशोधन होत असून, त्याचे पेंटट देशांना मिळत आहे. या पेटंटची संख्या लक्षणीय आहे. मात्र, त्या तुलनेत आपल्या देशात पेटंटची निर्मिती होत नसल्याचे चित्र आहे. त्यासाठी मॉडर्नसारख्या महाविद्यालयांना आधुनिकतेची कास धरून नावीण्यपूर्ण संशोधन करावे लागणार आहे. प्राचीन युगात देशात पुष्पक विमान होते. मात्र, आता राफेलसारखे विमान देशात आले असून, त्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यासाठी फ्रान्सचे अधिकारी आले आहेत. या परिस्थितीत आपण संशोधन करून, आत्मनिर्भर व्हायला पाहिजे, असेही कोश्यारी यांनी स्पष्ट केले.

डॉ. एकबोटे, डॉ. करमळकर यांनीही या वेळी मनोगत व्यक्त केले. प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अंजली सरदेसाई यांनी महाविद्यालयाच्या वाटचालीची माहिती दिली. सोसायटीचे कार्यवाह डॉ. श्यामकांत देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. झुंझारराव यांनी आभार मानले.